| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./२८३१/२०२४** **दिनांक :- ११/०४/२०२४**

**प्रसिद्धिपत्रक**

बंडगार्डन, कोरेगांव पार्क वाहतूक विभागाअंतर्गत साधु वासवानी पुल हा धोकादायक झाला असल्याने पुणे महानगरपालिकेकडून सदरचा पुल पाडुन नव्याने बांधण्यात येणार आहे. साधु वासवानी पुल पाडुन तो पुन्हा नव्याने बांधुन पुर्ण होईपर्यंत कोरेगांव पार्क, बंडगार्डन वाहतूक विभागाचे हद्दीमध्ये वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवणेकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन तात्कालीन , पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर यांनी कोरेगांव पार्क व बंडगार्डन वाहतूक विभागाचे हद्दीतील वाहनांचे वाहतूकीमध्ये पहिल्या टप्प्याअंतर्गत प्रायोगीक तत्वावर दिनांक १०/०२/२०२४ ते पुढिल आदेशापर्यंत जा.क्र.१००४/२०२४ दि.०७/०२/२०२४ अन्वये वाहतूकीत बदल केले होते. सदर प्रेसनोट मध्ये मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर वरील नमुद महाराष्ट्र शासन गृह विभागाचे नोटीफिकेशन व मोटार वाहन कायदा अन्वये अंशतः बदल करीत आहे. नव्याने केलेले बदल खालीलप्रमाणे आहे. तसेच यापुर्वी करण्यात आलेल्या प्रेसनोट मधील बदल हे **दिनांक १३/०४/२०२४ ते पुढिल आदेशापर्यंत** कायम राहतील.

## कोरेगांव पार्क वाहतूक विभागाअंतर्गत

- **मंगलदास चौकाकडुन येवुन मोबोज चौकामधुन मंगलदास रोडवरती सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश देण्यात येत आहे.**

**( रोहिदास पवार )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक,पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – १**

**प्रत :- सर्व संबंधितांना**